**मे. अंबूजा कॉंक्रीट नॉर्थ प्रायव्हेट लिमीटेड, मु. पो. बोरणार, ता. जि. जळगांव यांच्या स्टँडअलोन ग्राइंडिंग युनिटचा प्रस्तावित ६ दक्षलक्ष मेट्रिक टन प्रति वर्ष (MMTPA) (२X३ MMTPA ) उत्पादन क्षमतेचा ग्रीनफिल्ड स्टँडअलोन सिमेंट ग्राईंडिंग प्रकल्पाची दि. १९/०६/२०२५ रोजी झालेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे संक्षित्प इतिवृत्त**

---

मे. अंबूजा कॉंक्रीट नॉर्थ प्रायव्हेट लिमीटेड, मु. पो. बोरणार, ता. जि. जळगांव यांच्या स्टँडअलोन ग्राइंडिंग युनिटचा प्रस्तावित ६ दक्षलक्ष मेट्रिक टन प्रति वर्ष (MMTPA) (२X३ MMTPA ) उत्पादन क्षमतेचा ग्रीनफिल्ड स्टँडअलोन सिमेंट ग्राईंडिंग प्रकल्पाची दि. १९/०६/२०२५ रोजी झालेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे दि. १९/०६/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता रजत सभागृह, गांव -म्हसावद, तालुका आणि जिल्हा जळगांव येथे आयोजित करण्यात आली होती.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्र. E-45 of 2025 L. No. BO/JD (WPC)/PH/B-२५०५३०-FTS-००८५ दि. ३०/०५/२०२५ अन्वये सदरच्या लोकसुनावणीसाठी खालीलप्रमाणे समिति गठीत करण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| १) | जिल्हादंडाधिकारी, जळगांव<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - अध्यक्ष |
| २) | प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक | - सदस्य |
| ३) | उप-प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जळगांव | - समन्वयक |

सदरच्या पर्यावरण विषयक जाहीर सुनावणीसाठी खालील समिती सदस्य उपस्थित होते.

१) मा. आयुष प्रसाद , भा.प्र.से.
जिल्हादंडाधिकारी, जळगांव

२) श्री. लिंबाजी भड
प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक

३) श्री. करणसिंग अमरसिंग राजपुत
उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जळगांव

श्री. करणसिंग अमरसिंग राजपुत, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जळगांव तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी सदरच्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समितीचे अध्यक्ष व उपस्थितांचे स्वागत केले. तसेच समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी सुरु करण्यात आली.

सर्वप्रथम समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी सुचित केले की, भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दि.१४/०९/२००६ व सुधारीत दि.०१/१२/२००९ रोजीच्या अधिसुचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरण विषयक संमती घेणे बंधनकारक असून त्यापूर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजित करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. तसेच पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून दि. ०९/१०/२०२४ रोजी सदरच्या प्रस्तावित प्रकल्पाकरिता प्रकल्पाधारकास टर्म्स ऑफ रेफरन्स (T.O.R.)

प्राप्त झालेला असून प्रकल्पाधारकाने दि.०५/०५/२०२५ रोजी रितसर शुल्क भरुन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्याबाबत अर्ज केला होता.

समन्वयक यांनी नमूद केले की, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचा मुळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणाऱ्या परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पास बंधनकारक असणाऱ्या प्रदूषण नियंत्रण संयत्रणा व त्या अनुषंगाने कायदे याबाबतची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सुचनांचा विचार करणे.

मप्रनि मंडळाकडे प्राप्त लोकसुनावणी घेण्याबाबतच्या अर्जाच्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, जळगांव यांच्या परवानगीने दि.१९/०६/२०२५ रोजी सकाळी ११:३० वाजता मे. मे. अंबूजा कॉंक्रीट नॉर्थ प्रायव्हेट लिमीटेड या उद्योगाची पर्यावरण विषयक लोकसुनावणी घेण्याबाबत दिनांक निश्चित करण्यात आली होती. याबाबत नियमाप्रमाणे ३० दिवस अगोदर दि.१७/०५/२०२५ रोजीच्या मराठी दैनिक सकाळ व इंग्रजी दैनिक द टाइम्स ऑफ इंडिया मध्ये सदरच्या लोकसुनावणीबाबत सुचना प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच प्रकल्पाधारकाने प्रस्तावित प्रकल्पाच्या सादर केलेल्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल / पर्यावरण व्यवस्थापन योजना व कार्यकारी सारांश (मराठी व इंग्रजी) यांच्या प्रती खालील शासकीय कार्यालय तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर इच्छिुक नागरिकांना अभ्यास करण्याकरीता ठेवण्यात आल्या होत्या.

१) जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव.
२) जिल्हा उद्योग केंद्र, जळगांव.
३) जिल्हा परिषद कार्यालय, जळगांव.
४) उप-विभागीय कार्यालय जळगांव, ता. जि. जळगांव.
५) तहसिल कार्यालय, जळगांव,ता. जि. जळगांव.
६) गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, जळगांव, ता. जि. जळगांव.
७) ग्रामपंचायत कार्यालय, बोरनार, म्हसावद, नागदूली, डोमगांव, वाकडी, बिलवाडी, पाथरी, वाडली, वावदादा, दहीगांव ता. जि. जळगांव.
८) उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ जळगांव
९)प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, आयटीआय जवळ, सातपूर, नाशिक-४२२००७.
१०) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पॉईंट, ३ रा मजला, सायन (पूर्व), मुंबई-४०००२२.
११) पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, १५ मजला, मादाम कामा रोड, मुंबई.
१२) पर्यावरण,वने आणि हवामान बदल मंत्रालय,तळमजला,इस्ट विंग,नविन सचिवालय इमारत,सिव्हील लाइन्स, नागपूर-४४०००१.

सदर सुनावणीपावेतो १९ लेखी हरकती प्राप्त झाल्या होत्या व सुनावणीदरम्यान ५२ लेखी हरकती प्राप्त झाल्या. सदर सर्व लेखी हरकतींच्या प्रती प्रकल्प प्रवर्तकास पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी देण्यात आल्या आहेत, तसेच सदर प्रती संक्षिप्त इतिवृत्तासोबत जोडण्यात आल्या आहेत.

सदर जाहीर लोकसुनावणीस एकूण १५३ स्थानिक रहिवासी हजर होते. सोबत नांवासह स्वाक्षरींची यादी जोडली आहे.

सदर प्रस्तावित प्रकल्पाबाबत प्रकल्प प्रवर्तकांचे पर्यावरण सल्लागार, मे. पी आणि एम सोल्यूशन यांनी पीपीटी प्रेझेंटेशनसह विविध मुदयांवर माहिती दिली त्यापैकी कांही ठळक मुदयांवरील माहिती खालीलप्रमाणे पुर्नलिखित करण्यात येत आहे.

## प्रकल्पाचे वर्णन

| अनु. क्र. | घटक | तपशील |
|---|---|---|
| १. | प्रस्तावित क्षमता/ क्षेत्रफळ | **एकूण क्षेत्रफळ = २६.३७ हे.**<br>उत्पादन क्षमता = ६ एमएमटीपीए (२ x ३ एमएमटीपीए)<br>प्रकल्प क्षेत्र, रस्ता आणि पार्किंग = ५.१ हे.<br>खुले क्षेत्र = १२.५३ हे., हरितपट्टा = ८.७४ हे. |
| २. | प्रकल्पाची श्रेणी | **B1** श्रेणी - २४ डिसेंबर २०१३ रोजीच्या **MoEF&CC** कार्यालयीन स्मरणपत्रानुसार (**OM**) |
| ३. | पाणी | बांधकाम टप्पा: २०० केएलडी<br>कार्यान्वित टप्पा: पाण्याची गरज- २: ६०० केएलडी<br>(३०० केएलडी प्रत्येक मिल साठी) |
| ४. | वीज आणि पर्यायी व्यवस्था | वीज आवश्यकता: ३६ मेगावॅट (२ x १८ मेगावॅट)<br>स्त्रोत: राज्य वीज वितरण (MSEDCL - महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि.)<br>पर्यायी व्यवस्था: २ x ५०० kVA क्षमतेचे डीजी |
| ५. | मनुष्यबळ | **तपशील / बांधकाम टप्पा / संचालन टप्पा**<br>कायमस्वरुपी: ३० व्यक्ती / ३० व्यक्ती<br>तात्पुरता: १५०० व्यक्ती / १२५ व्यक्ती<br>**एकूण (ए)**: १५३० व्यक्ती / १५५ व्यक्ती |
| ६. | प्रकल्प खर्च | १४०० कोटी रुपये |
| ७. | पर्यावरण व्यवस्थापन योजनेचा खर्च | **भांडवली खर्च (लाखांमधे)**: **११२००**<br>**पुनरावृत्ती खर्च (प्रतिवर्ष लाखांमधे)**: **४१५** |
| ८. | कॉर्पोरेट पर्यावरणीय जबाबदारीसाठीचा अंदाजपत्रक | १४ कोटी रुपये |

## प्लांट रचना आणि उत्पादन
## उपकरणे आणि घटकांची यादी

| अ. क्र. | उपकरणे आणि यंत्रसामग्री | प्रमाण | क्षमता |
|---|---|---|---|
| A | **ग्राइंडिंग प्रणाली** | | |
| १ | वर्टीकल रोलर मिल | २ | प्रत्येकी ३ दशलक्ष मेट्रिक टन प्रति वर्ष (MMTPA) |
| २ | सिमेंट पॅकिंग यंत्र | ६ | २४० TPH क्षमतेसह डबल डिस्चार्ज |
| ३ | फ्लाय ऍश साठवण टाकी | १ | ४००० मेट्रिक टन (MT) |
| ४ | क्लिंकर साठवण टाकी | २ | ५०,००० मेट्रिक टन (MT) |
| ५ | जिप्सम | १ | १०,००० मेट्रिक टन (MT) (आच्छादित/झाकलेले शेड) |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | स्लॅग | १ | १२,००० मेट्रिक टन (MT) |
| ७ | हॉट गॅस जनरेटरसाठी कोळसा | १ | १००० मेट्रिक टन (MT) (आच्छादित/झाकलेले शेड) |
| B | **पॅकिंग संयंत्र** | | |
| १ | पॅकिंग यंत्रे | २ x ३ संख्या इलेक्ट्रॉनिक पॅकर्स | |
| २ | ट्रक भारभारण यंत्रे/ट्रक लोडिंग मशीन | प्रत्येक पॅकरला पॅक केलेल्या सिमेंटच्या बॅग लोड करण्यासाठी लोडरसोबत जोडले जाईल | |

**कच्च्या मालाचे प्रमाण**

| अ. क्र. | कच्चा माल (कोरड्या स्थितीतील आधार) | |
|---|---|---|
| | तपशील | प्रमाण |
| १. | क्लिंकर | ५.७ MMTPA |
| २. | जिप्सम (नैसर्गिक/रासायनिक) | ०.४८ MMTPA |
| ३. | फ्लाय ऍश | २.१ MMTPA |
| ४. | स्लॅग | ३.९ MMTPA |
| ५. | कोळसा (HAG साठी) | ०.१४ MMTPA |

**पाण्याची आवश्यकता**

| तपशील | एकूण |
|---|---|
| पिण्यासाठी आणि फ्लशिंगसाठी पाण्याचा वापर | ३० |
| प्रक्रियेसाठी पाण्याचा वापर | ४०० |
| उपकरणांच्या थंडकरणासाठी पाणी (बाष्पीभवन + ब्लो डाउन नुकसान + शुद्धीकरणातील बॅकवॉश पाणी) | १३० |
| हरित पट्टा विकास | ४० |
| **एकूण पाण्याचा वापर** | **६००** |
| सांडपाण्याची निर्मिती | २५ |
| **पाण्याचा पुनर्वापर** | |
| सीटी ब्लो डाउनमधून | ६० |
| सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पामधून शुद्ध केलेले पाणी | २२ |
| **धूळ दमन आणि हरित पट्टा विकासासाठी एकूण** | **८२** |

- प्रक्रियेतून कोणतेही सांडपाणी निर्माण होणार नाही. घरगुती सांडपाणी मूव्हिंग बेड बायोफिल्म रिॲक्टर (MBBR) तंत्रज्ञानावर आधारित सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP) मध्ये शुद्ध केले जाईल.
- घरगुती सांडपाणी ३० KLD (२ x १५ KLD) क्षमतेच्या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP) मध्ये प्रक्रिया करून, शुद्ध केलेले पाणी हरित पट्टा विकासासाठी व रस्त्यांवर्ती पाणी शिंपडण्यासाठी वापरण्यात येईल.

## वायू आणि ध्वनी गुणवत्ता व्यवस्थापन

| अनु. क्र. | प्रभाव | प्रस्तावित उपाययोजना |
|---|---|---|
| १ | हवेची गुणवत्ता | ➢ डीजी सेटच्या उत्सर्जन आणि चिमणीची उंची मानकांनुसार राखली जाईल.<br>➢ CEMS च्या सहाय्याने प्रदूषकांचे नियमित परीक्षण केले जाईल.<br>➢ हरित पट्टा विकसित केला जाईल.<br>➢ फक्त PUC सर्टिफिकेट प्राप्त असलेल्या वाहनांना प्रकल्प क्षेत्रामध्ये प्रवेश दिल जाईल.<br>➢ धूळ उत्सर्जन कमी करण्यासाठी रस्त्यांवर्ती पाणी शिंपडण्यात येईल.<br>➢ वीआरएमवर चिमणीसह विविध ट्रान्सफर स्टेशन वर बॅग फिल्टर बसवले जाईल. |
| २ | ध्वनी प्रदूषण | ➢ ध्वनीरोधक अडथळे आणि संरचना बसवले जातील.<br>➢ वाहने व यंत्रसामग्रीची नियमित तपासणी करून आवाज कमी ठेवला जाईल.<br>➢ व्यावसायिक आरोग्य आणि सुरक्षा व्यवस्थापन प्रणाली (OHSAS) आणि ध्वनी मानकांचे पालन सुनिश्चित केले जाईल.<br>➢ संरक्षण उपकरणे (PPE) वापरणे बंधनकारक असेल.<br>➢ हरित पट्टा विकसित केला जाईल.<br>➢ डिजी सेटला ध्वनिरोधक कवर मध्ये ठेवले जाईल. |

## जल गुणवत्ता व्यवस्थापन आणि पावसाचे पाणी संधारण

| अनु. क्र. | प्रभाव | प्रस्तावित उपाययोजना |
|---|---|---|
| 1 | पाणी प्रदूषण | ➢ सांडपाणी हे सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पामध्ये शुद्ध केले जाईल.<br>➢ बांधकाम स्थळावरून जवळच्या नैसर्गिक प्रवाह, कालवे इत्यादींमध्ये दूषित पाणी जाऊ नये याची काळजी घेतली जाईल.<br>➢ कार्यकलीन टप्प्यात ZLD (zero liquid discharge) प्रणाली असेल.<br>➢ पाण्याचा कार्यक्षम वापर केला जाईल आणि पावसाचे पानी संधारण (RWH) केले जाईल. |

## हरितपट्टा विकास

- एकूण **८.७४ हेक्टर** (म्हणजेच एकूण प्रकल्प क्षेत्राचा ३३.१४%) हे हरितपट्टा विकासासाठी राखीव ठेवण्यात आले आहे, जे शाश्वत पर्यावरण संतुलन राखण्यासाठी महत्त्वाचे आहे.
- हरितपट्टा विकास प्रकल्पाच्या परिसरातच झाडे लावून केला जाईल, जेणेकरून या क्षेत्राचे सौंदर्य सुधारेल तसेच कार्यक्षेत्राबाहेरील प्रदूषण कमी करता येईल. प्रकल्पाच्या परिसरात आणि आजूबाजूला नैसर्गिक हिरवळ कायम ठेवण्यासाठी आवश्यक ती काळजी घेतली जाईल.
- प्रकल्पाच्या सीमा भागात १० मीटर रुंदीचा तीन-स्तरीय हरितपट्टा विकसित केला जाईल.
- **झाडे लावणीचे नियोजन:** एकूण झाडे: **१७,५०० झाडे** CPCB/ MoEF&CC नियमांनुसार **प्रति हेक्टर २,००० झाडे** लावली जातील.
- **झाडांच्या जातींची निवड:** मातीच्या प्रकारानुसार स्थानिक आणि चांगल्या जिवंततेच्या दराने वाढणाऱ्या प्रजाती निवडल्या जातील.
- रोपणासाठी निवडलेल्या स्थानिक वनस्पती प्रजाती: बाभूळ (Babul), आवळा (Amla), कडुलिंब (Neem), शिसाम (Shisham), खैर (Khair), सरस (Siris, Kala Siris, White Siris), सुबभूळ (Subabul), इत्यादी.

## कामगारांसाठी आरोग्य आणि सुरक्षा उपाय

| अनु. क्र. | स्रोत | प्रतिबंधक उपाय |
|---|---|---|
| १ | कच्चा माल यार्ड, क्रशर, साठवणूक सिलो, ग्राइंडिंग मिल्स आणि पॅकिंग प्लांटमधून धूळ उत्सर्जन | ➢ पाण्याची फवारणी.<br>➢ सीलबंद सिलो.<br>➢ आच्छादित क्षेत्र आणि कचराकुंड्यांमध्ये साठवण.<br>➢ योग्यरित्या डिझाइन केलेले बॅग फिल्टर्स आणि प्रदूषण नियंत्रण उपकरणे.<br>➢ नियमित वैद्यकीय तपासणी.<br>➢ योग्य वैद्यकीय सुविधा.<br>➢ सतत वैद्यकीय निरीक्षण. |
| २ | ग्राइंडिंग मिल आणि पॅकिंग प्लांटमधून होणारा आवाज | ➢ निर्लसन प्रणाली (इन्सुलेशनची) व्यवस्था केली जाईल.<br>➢ कंपन शोषण सामग्रीचा वापर केला जाईल.<br>➢ आघात शोषण तंत्रज्ञान अवलंबले जाईल.<br>➢ कामगारांना कान संरक्षक (Ear Muffs) प्रदान केले जातील<br>➢ प्रकल्पाच्या परिघावर हरितपट्टा विकसित केला जाईल. |

## कॉर्पोरेट पर्यावरणीय जबाबदारी अंदाजपत्रक

प्रकल्पाच्या एकूण खर्चाच्या १% म्हणजेच १४.०० कोटी रुपये हा निधी कॉर्पोरेट पर्यावरणीय जबाबदारी (CER) उपक्रमांसाठी निश्चित केला आहे. हा निधी पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय (MoEF&CC), नवी दिल्ली यांच्या कार्यालयीन मेमो (F. No. २२-६५/ २०१७-IA.III, दिनांक ३०.०९.२०२०) आणि सार्वजनिक सुनावणीदरम्यान स्थानिक रहिवाशांच्या सूचना यानुसार अद्यतनित केला जाईल.

## प्रकल्पाचे फायदे

- हा प्रकल्प व्यापार, वाणिज्य आणि संबंधित सेवा क्षेत्रांमध्ये अधिक सहभागाला चालना देईल.
- यामुळे शहरी लोकसंख्येवरील ताण कमी होईल आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, कारण लोकांची ये-जा सुलभ होईल.
- प्रकल्पाच्या CSR उपक्रमांद्वारे सामाजिक पायाभूत सुविधांचे सुधारणा केली जाईल, जसे की शिक्षण, आरोग्य सेवा, स्वच्छता, गृहनिर्माण आणि पाणीपुरवठा.
- बांधकाम टप्प्यात एकूण १,५३० स्थानिक लोकांना त्यांच्याकडील कौशल्यावर (कुशल, अर्ध-कुशल किंवा अकुशल) आधारित प्राधान्याने रोजगार दिला जाईल.
- संचालन टप्प्यात १५५ लोकांना त्यांच्याकडील कौशल्य आणि शिक्षणाच्या आधारे रोजगार मिळेल, तसेच स्थानिक कंत्राटदार, चालक, स्वच्छता कर्मचारी यांसाठी अप्रत्यक्ष रोजगार संधी निर्माण होतील.
- सिव्हिल, मेकॅनिकल आणि इलेक्ट्रिकल क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होईल. स्थानिक व्यवसायांना देखील फायदा होईल, जसे की वाहन भाड्याने देण्याच्या सेवा, प्रकल्प देखभाल आणि हरितपट्टा विकास.
- स्थानिक लोकसंख्येची एकूण आर्थिक स्थिती रोजगार आणि व्यवसायाच्या संधीमुळे सुधारेल. म्हणूनच, हा प्रकल्प या क्षेत्राच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीवर सकारात्मक प्रभाव टाकेल आणि प्रदेशाच्या शाश्वत विकासास हातभार लावेल.

उपस्थितांनी नोंदविलेली मते व त्याबाबतचा अभिप्राय खालीलप्रमाणे संक्षिप्त स्वरुपात नमूद करण्यात येत आहे.

| अ.क्रं. | नांव व नोंदविलेले मत | प्रकल्प प्रवर्तकांचे पर्यावरण सल्लागार यांचा अभिप्राय | जाहीर लोकसुनावणी समितीचा अभिप्राय |
|---|---|---|---|
| १. | सौ. ललिता चंद्रकांत पाटील<br>रा. म्हसावद, ता.जि.जळगांव<br>गांवातील सुशिक्षित बेरोजगार महिलांना रोजगाराच्या संधीसाठी व गावांत स्वच्छतेसाठी विचार करावा. ग्रामसंघाला कार्यालय मिळावे. | | |
| २. | सौ. सुवर्णा संदीप पाटील<br>रा. म्हसावद, ता.जि.जळगांव<br>रोजगाराची व महिला सशकतीकरणाची संधी देण्यात यावी. कॅन्टीन / सुरक्षेच्या कामात महिलांचा समावेश करण्यात यावा. | | |
| ३. | श्री. राजेंद्र धोंडू चिंचोरे<br>रा. म्हसावद, ता.जि.जळगांव<br>पाण्याची पाईपलाईन व सांडपाण्याचा त्रास होणार नाही याचा विचार व्हावा. | . | |
| ४. | श्री. सतिश भालचंद्र चौधरी<br>रा. बोरनार, ता.जि.जळगांव<br>प्रत्येक प्रदूषणकारी प्रकल्पाचे दुष्परिणाम असतात. दुष्परिणामांची जाणीव जनतेला नाही. मप्रनि मंडळामार्फत या प्रकरणात शेतक-यांना मार्गदर्शन – पिकांवर परिणाम, जमीन नापीक इत्यादीं बाबत उदबोधन वर्ग घेण्यात यावा. आरोग्यावर होणा-या परिणामांवर दर्जेदार उपचार, सीएसआर फंड ७० टक्के बोरनार गांवासाठी वापरण्यात यावा. ७० टक्के अकुशल व ३० टक्के कुशल कामगार घेण्यात यावेत. स्थानिकांना प्राधान्य देण्यात यावे. सिमेंट विक्री डिस्ट्रीब्यूटर / डीलरशीप बोरनार गांवातील नागरिकांना देण्यात याव्यात. कंपनीने गिरणा नदीपात्रातून पाणी उचलू नये, शेत प्रक्रियेवर आधारित समांतर प्रकल्प उदयोगाने सुरु करावा. | | |
| ५. | सौ. प्रतिभा लालचंद पाटील<br>रा. बोरनार, ता.जि.जळगांव<br>गावाला प्रदूषणाची बाधा होऊ नये याची मप्रनि मंडळाने काळजी घ्यावी. बचत गटांना मदत करावी. | .. | मा.जिल्हादंडाधिकारी, जळगांव यांनी नमुद केले की, जर मुददे सारखेच असतील तर एकाच पत्रावर बाकीच्यांनी सहया करुन दयावेत जेणेकरुन एकच मुददा वारंवार चर्चिला जाणार नाही. |
| ६. | सौ. साधना योगेश पाटील<br>रा. बोरनार, ता.जि.जळगांव<br>सिमेंट उदयोगामुळे होणा-या नुकसानी बाबत विचार व्हावा. | .. | ... |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | सौ. शितल दिपक चिंचोरे.<br>रा. म्हसावद, ता.जि.जळगांव<br>प्रकल्पाची देण्यात आलेल्या माहिती बाबत नमुद केले की, ४ ते ५ शाळा नमुद करण्यात आल्या तथापि, प्रत्यक्षात ४५ शाळा व महाविदयालये आहेत. २ ते ३ ग्रामीण रुग्णालये नमुद करण्यात आले तथापि, प्रत्यक्षात १२ ग्रामीण रुग्णालये आहेत परंतु त्यांनी फक्त दोनच दाखवले. सदर परिसरामध्ये बरेचसे वन्य जीव अस्तित्वात आहेत त्यांचाही विचार करावा जसे की, नीळ गाई, हरीण, रान मांजरे, कोब्रा इत्यादी वन्यजीव आहेत. तसेच पाण्याचा विषय हा मोठा गंभीर आहे ज्यामुळे प्रश्न निर्माण होणार आहे. त्यांनी सांगितले की, गिरणा नदीपात्रातून पाणी घेणार परंतु गिरणा नदीतून पाणी दिले तर आम्हा शेतक-यांना जमीनीला पाणी पुरणार नाही व पाण्याचा प्रश्न गंभीर बनेल. तसेच हा प्रकल्प सुरु झाला तर यातून धुळीचे कण हवेत उडून कार्बन डायऑक्साईड निर्माण होऊन व परिसरातील गांवकरी आजारांनी ग्रस्त होतील आणि अशा लोकांना फुफुसाचे आजार झाले तर काय होईल याची जबाबदारी कोण घेणार. जर मप्रनि मंडळाने सदर उदयोगाला परवानगी दिली तर ७० टक्के लोकांना फुफुसाचे आजार होऊ शकतील जरी रोजगार ही प्रमुख गरज असली पण जगलो तरच रोजगार मिळेल म्हणजेच या प्रकल्पामुळे आमचे १० पट नुकसान होणार आहे याबाबत विचार करावा आणि यामुळे जो आरोग्य आणि शेतीचा प्रश्न निर्माण होणार असेल तर विरोध राहील. मग हा प्रकल्प आम्हाला वरदान आहे की शाप आहे, फक्त म्हसावद गांव नाही तर आजूबाजूचे इतरही गाव ज्यांची लोकसंख्या १० हजार पेक्षा जास्त आहे ज्याला (प्रकल्पाला) १५ खेडी जोडलेली आहेत. या सर्व गावांचा हवा प्रदूषण व पाणी प्रदूषणाचा प्रश्न निर्माण होणार आहे. मग हा प्रकल्प नागरिकांच्या हितासाठी आहे की नुकसानीसाठी आहे? जे पाणी कंपनी वापरणार आहे तेच पुन्हा रेन वॉटर हार्वेस्टींग करुन जमीनीत टाकणार आहे असे केमिकलयुक्त पाणी आजुबाजूच्या शेतक-यांच्या विहिरींमध्ये उतरणार आहे आणि तेच प्रदूषित पाणी आमच्या पिकांमध्ये येईल. जर शासनाने या प्रकल्पाला मंजूरी देण्याचे ठरविले असेल तर आमच्या समस्यांना तोडगा दयावा असे मी आमच्या गावाच्या व प्रकल्पाच्या इतर गावांच्या वतीने आपल्याला सांगत आहे. आम्ही एकही आश्वासन तोंडी ऐकुन घेणार नाही तुम्ही जे ही | | सिमेंट उदयोगात औदयोगिक सांडपाणी निर्माण होत नाही. शुध्द केलेले पाणी हरित पटटा विकासासाठी व रस्त्यांवरती शिंपडण्यासाठी वापरण्यात येईल. कंपनीने सीएसआर फंडातून स्थानिक ठिकाणी एसटीपी बांधून दयावेत, बंदीस्त गटार बांधून दयाव्यात, गांव प्लॅस्टीकमुक्त करण्यासाठी मशिनरी खरेदी करु शकतात जेणेकरुन प्लॅस्टीकचे चांगले वस्तू तयार करण्याचे उदयोग सुरु होऊ शकतात. १५५ लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. जिल्हा दंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी, जळगांव यांनी नमुद केले की, आपण सर्वांनी मांडलेली मागणी व सुचना या रास्त दिसत आहेत परंतु आपल्याला कांही गोष्टीं बाबत गैरसमज झालेला दिसतो म्हणून आपणास मी कांही गोष्टी विशलेषन करन सांगू इच्छितो. हा जो प्रकल्प आहे हा कांही वेगळा प्रकल्प नाही. आपल्या जिल्हयात नशिराबाद येथे ओरिएंट सिमेंट या नांवाने अशाच प्रकारचा एक प्रकल्प लावण्यात आलेला आहे. देशभरात शेकडो हजार ठिकाणी याबाबतचा अनुभव नशिराबादच्या गावाच्या लोकांना आहे. तो जो प्रकल्प आहे तोच हा सेम प्रकल्प आहे. हे आपण जे बघतो आपल्या आजुबाजूला आटाचक्की कशी असते त्याच स्वरुपाची साध्या भाषेत सांगायचे झाले तर सिमेंटची आटाचक्की आहे. सिमेंटला पाणी लागत नाही तसेच या प्रकल्पालाही पाणी लागत नाही. ६०० केएलडी बाबत मी आता ऐकले कोणाला माहिती आहे का की ६०० केएलडी म्हणजे किती ? ६०० केएलडी म्हणजे एका छोटया हौसिंग सोसायटीला लागणारे पाणी. थोडक्यात म्हणजे पाण्याच्या छोटया तीन टाक्या. सिंटेक्सच्या टाक्या. आपल्याला बाथरुम व |

| | | | |
|---|---|---|---|
| | कांही दयाल ते आम्हाला लेखी स्वरुपात दयावे. या प्रकल्पाचा जर सर्व नागरिकांना व गावांना फायदा होत असेल तर आम्ही सर्व आपल्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहू. परंतु यातुन आमच्या आरोग्याचा व शेतीचा प्रश्न उभा राहत असेल तर या गावातूनच नव्हे तर आजुबाजूच्या गांवातुन विरोध असेल असे मी सर्वांच्या वतीने जाहीरपणे सांगत आहे. | | टायलेटकरिता जेवढे पाणी लागते त्याहीपेक्षा कमी. आपल्या गावातील जल जीवन मशीन अंतर्गत ६००० केएलडी इतकी टाकी असते. त्याही पेक्षा १० पट कमी इतके पाणी फक्त या प्रकल्पाला लागते. हवे तर हे गुगल करुन बघा मी म्हणतो म्हणुन खरे समजु नका. आपल्यात जो कांही गोष्टींचा गैरसमज आहे तो दुर करावा. जेणेकरुन आता पुढे जो कोणी बोलेन ते रिपीट होणार नाही. म्हणुन मी कांही गोष्टींबाबत गैरसमज दुर करण्याचा प्रयत्न केला. दुसरी गोष्ट म्हणजे या प्रकल्पाबाबत दुसरी तक्रारी जी असते ती माझ्याकडे येणारी ट्रक त्याच्यामुळे होणारे जे प्राब्लेम आहेत जसे की, रस्ता फुटणे, या तक्रारी परंतु या प्रकल्पामुळे फायदा हा आहे की, येथे ट्रकचा वापर नसुन जो पण माल येणार आहे तो सर्व रेल्वेने येणार आहे व रेल्वेने जाणार आहे. तुमच्या रस्त्यावर यांची ट्रक येणार नाही. रस्ता फुटण्याचा प्रश्न नाही. रस्ता फुटला नाही म्हणजे बाकी गोष्टींचा प्रश्न नाही. फॅक्टरीमधून कुठल्याही प्रकारचे धुळ प्रदुषण हे बाहेर पडत नाही. जे पण कांही थोडे बाहेर पडते शेतावर, पिकावर ते फक्त टॅक्टरमधून किंवा ट्रकमधून जी राख वगैरे जी व्यक्ती घेऊन जात असतील ते उडल्यामुळे पिकांचे नुकसान होते असे प्राब्लेम दीपनगर, भुसावळ अशा ठिकाणी होतात परंतु या प्रकल्पामध्ये असे होणार नाही हे पण कांही आहे ते सगळ क्लोजमध्ये येणार क्लोजमध्ये जाणार आणि सर्व काही रेल्वेने होणार त्यामुळे येथे बाकीचा प्रश्न उदभवत नाही. परंतु यामध्ये राखेचाही प्रश्न नाही. सरळ सिमेंटचा विषय आहे. राख हलकी असते त्यामुळे उडते परंतु सिमेंट हे त्याप्रमाणात जड असते लांब जात नाही त्याला पाणी लागणार नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | झिरो डिस्चार्ज आहे म्हणजे शेतात किंवा नाल्यात जाणार नाही असेहीं सिमेंट फॅक्टरीमध्येही पाणी लागत नाही. ज्या लोकांनी सिमेंट फॅक्टरीमध्ये काम केले आहे त्यांना माहिती आहे की, सिमेंट आणि पाणी याचा मेळ बसत नाही. नशिराबाद सिमेंट फॅक्टरी व ही सिमेंट फॅक्टरी यामध्ये फरक हा आहे की, ट्रकचा वापर होत नाही आणि या ठिकाणी जो वापर होणार आहे तो ट्रेनमधून होणार आहे लोडींग / अनलोडींग फक्त जर आपण लेआऊट बघीतला तर समजेल की, मोठा एरीया जो घेतलेला आहे तो ट्रेनच्या प्लॅटफॉर्मसाठी घेतला आहे थोडक्यात म्हणजे फॅक्टरी एरीया पेक्षा प्लॅटफॉर्म एरीया मोठा आहे. यांना लेआऊट परत दाखवून दयावा असे सांगितले आता बाजूचे शेतकरी महोदया बोलले त्यांचा जो प्रश्न होतो पाईपलाईनचा काही इशू होता त्याबाबत प्रकल्प प्रवर्तकाला संबंधित शेतक-यासोबत संपर्क साधून पाईपलाईनचे प्रेशरही फुटणार नाही व शेतक-याचेही नुकसान होणार नाही अशा ज्या काही उपाय योजना करता येतील त्या करण्याच्या सकारात्मक सुचना दिल्या. या ठिकाणी बॅच फिल्टर बाकी गोष्टी आहेत आता राहीला सीएसआरचा प्रश्न सीएसआर हा म्हणजे दरवर्षी जमा होणारा पैसा असतो. या गोष्टी आधी लक्षात घ्या. त्याच्यामध्ये ना आश्वासन असतो ना कांही असतो. कोणी पण व्यक्तीने तुम्हाला सीएसआरचे आश्वासन दिले तर ते एका कागदासारखे आहे असे समजा. कागदावर जरी लिहून दिले तरी त्याचा फारसा फरक पडत नाही त्याचे कारण असे आहे की, जर कंपनी तोटयात गेली किंवा जर नफा झाला तरच या गोष्टींवर सीएसआर अवलंबून असतो. तरी कृपा करुन या गोष्टी समजून |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | घेण्यात याव्यात. यामध्ये सीईआर हा कॉर्पोरेट इन्व्हायर्नमेंट रिस्पानसिबीलिटी महत्वाची असते. ज्यामध्ये महिलांनी सांगितले की स्वच्छता मोहीम व वगैरे येथे खर्च करता येतो. मी तुम्हाला या ठिकाणी तुम्हाला व कंपनीवाल्यांनाही सुचना करणार आहे की, ती त्यांची मर्जी आहे की, त्यांनी कुठल्या बाबतीत खर्च करावा. माझी सुचना आणि संदेश असेल तुम्हाला या परिसरातला जागणारे सर्व प्रथम प्लास्टिकचे युनिट बांधून दयावे. एक एक गांव ४० लाखात कव्हर होते किंवा गावा गावामध्ये सांडपाणी व्यवस्थापनासाठी म्हणजे तुमच्या गटारीमधून जे पाणी जाणार आहे ते शुध्द होऊन जाणार आहे. म्हणुन एसटीपी बांधून दयावेत. तिसरी जी गोष्ट आहे की हरित पटटा करण्यात यावा. जसे की, मियावाकी जंगल तयार करणे म्हणजे घनदाट झाडींची वृक्षारोपण. यामुळे परिसरामध्ये हिरवागार पटटा निर्माण करता येऊ शकतो. शिवाय जर अतिरिक्त पैसे मिळाले तर आपल्याला गावासाठी बंदीस्त गटार योजना करता येईल. किंवा पाणी स्वच्छता प्रकल्प किंवा डब्ल्यूटीपी प्रकल्प यासारख्या गोष्टी कंपनीकडून तयार करुन घेता येतील.या चार पाच गोष्टी ज्या आहेत त्या करुन गांवाला प्लास्टिक मुक्त करण्यासाठी सुध्दा माझी विनंती कंपनीवाल्यांना असेल की, कांही मशिनरी ते विकत घेऊन देऊ शकतात. या गावचे ग्रामपंचायत ग्रामसंघ व महिला बचत गट आहेत यांनी ती मशिनरी चालवायची जबाबदारी स्वत: घ्यावी. कायमस्वरुपी त्याला चालविण्यासाठी जी मेहनत लागणार आहे घरोघरी जाऊन कचरा संकलन करावयाचा आहे कारण प्लास्टिक तुम्हाला सर्वांना गोळा करुनच आणावा लागेल तो |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | काय स्वयंभु प्रकट होणार नाही. याच्यासाठी जी मेहनत लागणार आहे ती आपण स्वत: गांवक-यांनी घ्यावी व त्यातुन उत्पन्नाचे साधन तयार करावे. प्लास्टीकचे चांगले पदार्थ तयार करुन घ्यावे. चटई तयार करुन घ्या. तसेच कपाट वगैरे इतर गोष्टी तयार करुन घ्या. जसे जळगांवमध्ये उदयोग आहे. जेणेकरुन चांगल्या उदयोगाची सुरुवात करता येईल. हा प्रकल्प म्हणजे काय तुमचा वीज निर्मीती प्रकल्प नव्हे. ज्यामध्ये इथ कोळसा येणार आणि वीज निर्माण होणार किंवा मोठी चिमणी लावणार १० किमी पर्यंत प्रदूषण होणार असे काही नाही हे म्हणजे थोडक्यात चक्की गिरणी आहे त्याचा दुसरा फायदा हा आहे की, त्यांचे ट्रक तुमच्या रस्त्यावर येणार नाहीत. सर्व काही ट्रेनने येणार ट्रेनने जाणार या प्रकल्पाचे पुर्ण प्लॅनिंगच रेल्वे आधारित आहे. आपण जे कांही ६०० केएलडी बोलतो वास्तविक त्यापेक्षा आपण ६०० एमएलडी प्लान्ट करतो. म्हणजे ६०० पेक्षा १०० पट जास्त पाणी. हे असे जळगांव / भुसावळ वगैरे मोठया शहरांसाठी एमएलडीमध्ये करावा लागतो. तुमच्या गावासाठी जेंव्हा आपण साधारण पाणीपुरवठा योजना करतो ते आपण ६०० केएलडी किंवा जास्तीचा करतो परंतु कंपनीसाठी फक्त ६०० केएलडीचीच मागणी आहे. जेजी गिरणावर मोटर टाकुन किंवा त्यांनी स्वत: विहीर करुन जरी घेतला तरीही कोणाच्याही लक्षातही येणार नाही इतके कमी पाणी त्यांना लागते. तरी याच्याबददल कोणी गैरसमज करुन घेऊ नये. तरी कोणालाही शंका असेल तर विचारुन घ्या मी आहे सोडविण्यासाठी आणि पिकावर परिणाम याबाबतीत सांगायचे झाल्यास माझ्या माहितीनुसार तुम्ही इतर ठिकाणीसुध्दा अभ्यास करा. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | देशाचा अभ्यास करा. पिकावर याचा काही परिणाम होत नाही. याचा एक परिणाम होऊ शकतो या ठिकाणी उदयोग आणि कामगार आले तर काही ठिकाणी हौसिग कॉलनी व प्लॉट करणे करिता आहे ती शेती सोडून देणारेही शेतकरी आहेत. यामुळे केलेल्या प्लॉटींगमुळे नागरिकरण या भागात वाढू शकते. त्या परिणीने जमीनीचे दरही वाढतात. कम्युनिटी कॉम्प्लेक्स वाढतात आणि कितीक लोकांना डायरेक्ट व इनडायरेक्ट रोजगार प्राप्त होतात. जवळपास १५५ डायरेक्ट रोजगार उपलब्ध होणार आहेत. मग आता तुम्ही म्हणाल की आमच्या गावातील लोकांना डायरेक्ट घ्या. परंतु यामध्ये मी तुम्हाला असे सांगेन की, जेंव्हा एखादा तांत्रीक प्रकल्प येतो तेंव्हा त्याच्यावर काम करायला लागतो इंजिनिअर, टेक्निकल एक्सपर्ट, इलेक्ट्रीशियन यासारखे किती लोक लागतात जोपर्यत प्रकल्पाचे बांधकाम पुर्ण होत नाही तोपर्यंत आपण काय करु की, या गावामध्ये काही लोकांना आयटीआय प्रशिक्षण देऊ, इंजिनिअर प्रशिक्षण करुन देऊ, काही मुलांना तुम्ही स्कॉलरशिप देऊन टाका. यामुळे गावातील व्यक्तिला गावातच रोजगार मिळेल आणि ते कंपनीसाठी जास्त इमानदार पण वागतील. दीपनगरलाच पण अशाच प्रकारचा प्रॉब्लेम आलेला होता. आपल्या मुलांना इंजिनिअरींग शिकवायचे आणि सिक्युरिटी गार्डची नोकरी मागायची आता मला सांगा कंपनी किती सिक्युरिटी गार्ड घेऊ शकते. या गोष्टीबददल विचार करावा लागेल. म्हणून माझी विनंती आहे की, या प्रकल्पाला ज्या प्रकारचा कामाचा माणुस लागेल त्याप्रकारचे लोक या गावात तयार करा. एकदा का तयार झाले मग हवं तर या प्रकल्पाला काम करा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | नशिराबाबदला काम करा किंवा यांच्या इतर ठिकाणी काम करा. जिथे जिथे हजारो यांचे प्रकल्प आहेत जसे की, नागपूर असेल, चंद्रपूर असेल अशा अनेक ठिकाणी या ठिकाणी नोकरी करा किंवा महाराष्ट्राच्या बाहेरही नोकरी करा जगात काम करायचे कोण तुम्हाला अडवणार आहे. थोडक्यात काय तर लोकांना तयार करुन घेणं आपली जबाबदारी आहे. ते आपण करुन घेऊ . अजून अनेकांनी एक विषय घेतला की, मार्गदर्शक काम झाले पाहिजे आपली आजची बैठक ही सुध्दा एक प्रकारे मार्गदर्शक कामासाठीच आहे. मी जेंव्हा पुण्याला होतो तेंव्हापण अशा बैठकी प्रत्येक हप्त्याला राहायच्या. आपल्याला जर अजून कांही मार्गदर्शक वर्ग हवे असतील तर आपण ग्रामपंचायत व इतरांना सांगून मार्गदर्शक वर्ग घेऊ. आपल्या एका सन्माननीय व्यक्तीने अजून एक विषय मांडला होता की, आरोग्य विमा काढण्या बाबत. जगातला सर्वात चांगला आरोग्य विमा कोणता आहे. एलआयसी, जीआयसी इत्यादी इत्यादी कोणता आहे. जगातला सर्वात चांगला विमा असेल तर आयुष्यमान भारत हा आहे. कुठल्याही जवळच्या सरकारी दवाखान्यात जावून गोल्डन कार्ड घेतले तर जवळपास १५०० प्रकारचे आजारावर उपचार करता येतात ते पण फ्रीमध्ये. आजपर्यंत जळगांवमध्ये कोणत्याही आजारावर ५ लाखाच्या वर खर्च अदयाप झालेला नाही. जगाच्या पाठीवर भारतात कुठेही मोठया सुपर स्पेशिलिटी हॉस्पिटलमध्ये जाऊन आपण उपचार घेऊ शकता इतका छान आरोग्य विमा म्हणजे आयुष्यमान भारत आहे. असे असतांना देखील तुम्ही लोक म्हणता की कंपनीने आरोग्य विमा काढावा. जे आहे त्याचा लाभ तर |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | घ्या. तरीही काही अडचण वाटल्यास माझ्याकडे या मी कधीही मदतीला तयार आहे. तरी बहुतेक विषय हे मी कव्हर केलेले आहेत. |
| ८. | श्री. फिरोज सागीर पटेल<br>रा. बोरनार, ता.जि.जळगांव<br>सदरचा प्रकल्प रेल्वे लगत किंवा रस्त्या लगत उभारण्यात येणार आहे याचे लेखी देण्यात यावे. पर्यावरणाच्या बाबतीत पीपीटीमध्ये कंपनी अपुर्ण माहिती सादर केली आहे. कंपनीने सांगितले की, ते २४०० झाडे लावणार आहेत पण त्या २४०० झाडांपैकी किती झाडे टिकणार आहेत. त्याचे मॉनिटरींग कसे करणार आहेत. मॉनिटरींग करतांना ग्रामपंचायतीला सहभागी करुन घेतले जाईल काय. ऑडीट बाबतची तक्रार कोणाकडे करता येते. हवेची गुणवत्ता तपासणीसाठी कोणती व्यवस्था करण्यात येणार आहे. डिझास्टर मॅनेजमेंट प्लॅन कंपनीकडे काय आहे. स्कीलप्रमाणे रोजगार देण्यात यावा व गटबाजी करण्यात येऊ नये. अजून तरी ०५ ते १० वर्षापर्यंत रोजगार मिळू शकेल अशी मला शंका आहे. | कंपनीचे प्रतिनिर्धीनी नमुद केले की, आपत्कालीन परिस्थितीचा मसुदा तयार असुन कोणत्याही प्रकारची आपतकालीन परिस्थती निर्माण झाली तर कंपनी त्यासाठी यथायोग्य तयार आहे. याबाबत प्रत्येक कर्मचा-याला प्रशिक्षण देण्यात येते. तसेच सरकार मान्यता प्राप्त अग्नि विरोधक यंत्रणा आम्ही बसविणार आहोत. रस्त्यालगत फक्त एक कॅबिन प्रस्तावित आहे.कन्स्टक्शन फेजमध्ये रस्त्याचा वापर करण्यात येईल तर ऑपरेशनल फेजमध्ये रेल्वेचा वापर करण्यात येईल. वेळोवेळी मॉकड्रील करण्यात येते, आग रोखण्यासाठी किंवा अपघात टाळण्यासाठी प्रमाणित साहित्याचा | मा. जिल्हा दंडाधिकारी यांनी नमुद केले की, मुळातच हा प्रकल्प पुर्ण रेल्वेलाईनलाच आहे. हे आपण बघु शकता फक्त कंपनीचे बांधकाम पुर्ण होईपावेतो त्यांना रस्त्याने वापर करावा लागणार आहे हे ही त्यांनी रिपोर्टमध्ये सांगितले आहे. मोठया प्रमाणात सर्व कार्यभार रेल्वेनेच असल्याचे त्यांनी त्यांच्या रिपोर्टमध्ये नमुद केले आहे व तो रिपोर्ट तुमच्या व माझ्या समोर आहे. म्हणुनच कंपनीने रेल्वेच्या बाजूने जास्तीत जास्त जागा विकत घेतलेली आहे. वृक्षारोपण टिकणे बाबतचे प्रमाण हे ८० टक्के असते. यामध्ये लोकल प्रजातीचे झाडे लावली जातात तशी यादी सुध्दा प्रोजेक्ट रिपोर्टमध्ये दिलेली आहे. तसेच नजीकच्या रिझर्व्ह फॉरेस्ट परिसरामध्ये झाडे लावणे अपेक्षित आहे व येथे नजीकचे ०३ रिझर्व्ह फॉरेस्ट अेरीया दाखविलेले आहेत. ज्याचे घनदाट वृक्षारोपण त्यांनी करावयाचे आहे. याच्या मॉनिटरींगसाठी त्यांची एक ऑडीट आणि ॲसेसमेंट टीम असते त्याच्यावर जर कोणाचे आब्जेक्शन असेल अथवा उदयोगाने पर्यावरणीय अटी व शर्तीचे उल्लंघन केल्याचे आढळून आल्यास ग्रीन ट्रीब्यूनलकडे दाद मागता येते. भारतीय संविधानानुसार २९ मुदयांवर कार्यवाहीचे ग्रामपंचायतींना अधिकार आहेत त्यासाठी न्यायालयीन व्यवस्था आहे. तक्रार मप्रनि मंडळाकडे, हरित लवादाकडे, संबंधित प्रांत अधिकारी यांचेकडे करता येते.<br>यानंतर श्री.करणसिंग राजपूत, उप-प्रादेशिक अधिकारी तथा समन्वयक यांनी सांगितले की, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | वापर करण्यात येतो. | हवेची गुणवत्ता तपासण्यासाठी ऑनलाईन मॉनिटरींग स्टेशन उभरण्यात येतील व ते सीपीसीबीच्या सर्व्हरला कनेक्ट असतात. मोबाईल अॅपद्वारे हवेची गुणवत्ता बघता येते.<br>मा. जिल्हा दंडाधिकारी यांनी नमुद केले की, यावर मोबाईद्वारे लक्ष ठेवता येते व सदर यंत्रणा भुसावळ औष्णिक विदयुत केंद्रात सुध्दा आहेत ज्याच्या नोंदी दिल्ली पर्यंत दिसतात. सर्व डेटा हा रिअल टाईम बेसीसवर असतो. उदा. जसे की, आता आग लागली तर धुराचा आकडा काही सेकंदात तिथे डिस्प्लेवर दिसतो. याव्यतिरिक्त मप्रनि मंडळही स्वत: आणि कंपनीसुध्दा त्यांच्या प्रदूषणाचे सॅम्पल घेऊन पृथकरण करुन घेतात व मप्रनि मंडळाकडे सादर करतात तेही आपण बघु शकता. डीपीडीसीच्या निधीमधून कौशल्य विकासासाठी संधी उपलब्ध करुन देण्यात येइल ज्यायोगे रोजगारात वाढ होणार आहे, प्रत्येकाने प्रयत्न करावा. |
| ९. | श्री. पंकज संजय चौधरी<br>रा. बोरनार, ता.जि.जळगांव<br>शेतक-यांचे पिकांचे नुकसान होणार नाही, उदरनिर्वाहासाठी काही निश्चित धोरण, प्रदूषणामुळे आरोग्यावर परिणाम. गिरणा नदीतून पाणी घेतल्यास परिसरातील शेतजमीनींसाठी पाण्याची अडचण निर्माण होऊ शकते. ज्या प्रमाणात गांवातील शेती उदयोगाने घेतले आहेत त्याप्रमाणात रोजगार दयावा. जमीनीचा दर सरासरीपेक्षा कमी देण्यात आला. तसेच दोन गांवांच्यामध्ये वृध्दांची संख्या जास्त आहे त्यांना कंपनीच्या प्रदूषणामुळे त्रास झाला तर काय करणार . | उदयोगाच्या प्रतिनिधींनी नमुद केले की, उदयोगासाठी लागणारे पाणी शासकीय परवानगींनेच घेतले जाईल. तसेच पाण्याचा वापर हा उत्पादन प्रक्रियेमध्ये लागणारच नसल्याने पाणी वापर अति होणे किंवा पाणी प्रदूषण होणे असे प्रश्न उदभवणार नाहीत.<br>जातापर्यंत जे ही काही प्रश्न विचारण्यात | श्री. करणसिंग राजपूत, उप-प्रादेशिक अधिकारी तथा समन्वयक यांनी नमुद केले की, आरोग्य व रोजगारा बाबत कंपनीचे प्रतिनिधी आपल्याला सविस्तर सांगतीलच.तसेच मा. जिल्हादंडाधिकारी यांनी नमुद केले की, संदर कंपनीमुळे कुठल्याही प्रकारचा त्रास होणार नाही. जर त्रास झालाच तर सरकार आहे, मप्रनि मंडळ आहे मी आहे. कारण सदर कंपनीमध्ये कोणत्याही प्रकारचे केमिकल वापरले जात नाही. कंपनीने सर्व विस्तृत रिपोर्ट आपल्या सर्वांच्या समोर मांडलेला आहे तो बघावा. या कंपनीला कोणत्याही प्रकारचे पाणी लागत नाही. या कंपनीने पाणी वापरणे म्हणजे यांच सर्व उत्पादन खराब करण होय कारण अशा प्रकल्पासाठी पाणी म्हणजे शत्रू |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आले अशा सर्व प्रकारच्या प्रश्नांची दखल घेण्यात आली असून कंपनीद्वारा आपणास कोणत्याही प्रकारचा प्रदूषणाचा त्रास होणार नाही याची परिपुर्ण दक्षता घेण्यात येईल. याऊलट कंपनीचे प्रयत्न असणार आहेत गावाच्या उभारीला आणि प्रगतीला हातभार कसा लावता येईल हाच प्रयत्न सदैव असणार आहे. तसेच मा. जिल्हाधिकारी यांनीही दुजोरा दिलेला आहे की, सर्व प्रकारची वाहतुक रेल्वेनेच होणार असल्याने कोणत्याही प्रकारचे प्रदूषण होण्याची शक्यता नाही. | आहे. त्यामुळे या कंपनीचा पाण्यासोबत संबंध नाही. सदर उदयोगात औदयोगिक सांडपाणी निर्माण होणार नसून घरगुती सांडपाण्यावर प्रक्रियाकृत सांडपाणी हरित पटटा विकासासाठी करण्यात येईल. हवेची गुणवत्ता राखण्यासाठी आवश्यक ते व्यवस्थापन करण्यात येईल. उदयोगाने खरेदी केलेली जमीन संपादित करण्यात आलेली नसून उदयोगाने थेट जमीनी खरेदी केल्या आहेत. त्यामुळे येथे कोणीही प्रकल्पग्रस्त नाही. कुठल्याही सरकारी यंत्रणेद्वारे सदर भागात जमीनीची खरेदी विक्री सरकारी काम म्हणून या कंपनीच्या नांवे नाही. परंतु या कंपनीत नोकरी लागण्याकरिता जे आवश्यक कौशल्य आहे ते निर्माण होण्याकरिता परिसरातील गोर गरीब, भुमिहीन बेरोजगारांना जिल्हा नियोजन समितीमार्फत प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करुन देण्यात येईल. प्रस्तावित रोजगाराच्या संधीची स्थानिक जनतेस माहिती होण्यासाठी उदयोगाने स्थानिक वर्तमान पत्रात बातमी प्रसिध्द करावी. जमीनीचा दर हा विषय कंपनीशी संबंधित आहे. |
| १०. | श्री. सय्यद देशमुख<br>शेतकरी संघटना<br>रा. बोरनार, ता.जि.जळगांव<br>शेतक-यां बाबत कांही विचार होत नाही. उदयोगाला किती ठिकाणी आत / बाहेर जाण्यासाठी सुविधा राहील. शेतकी खात्याच्या अधिका-यांकडून मार्गदर्शन घेणे आवश्यक असल्याचे नमुद केले. प्रकल्पाचा परिणाम दोन गांवावर होणार असल्याचे नमुद केले. ओव्हर ब्रीज जवळील रस्ता अरुंद दाखविण्यात आला आहे. खर तर अशा प्रकारच्या कंपनीमुळे जे प्रदूषण होते ते आपल्याला इतर दिवशी कळून | | मा. जिल्हादंडाधिकारी यांनी नमूद केले की, अशा प्रकारची कोणतीही कंपनी जेंव्हा येते त्यापुर्वी आजूबाजूच्या १० किमी च्या परिघाचा पर्यावरणीय अभ्यास करण्यात येतो. याचा अर्थ असा नाही की, एवढया भागातच प्रदूषण होते. त्याला फक्त टेक्निकली अभ्यासासाठीच वापरतात. कोणतीही कंपनी जेंव्हा येते तेंव्हा ती कंपनी अशा हिशोबानेच उभारतात जेथे त्यांच्यावर लोड |

| | | | |
|---|---|---|---|
| | येत नाही. ते फक्त आणि फक्त उन्हाळयाच्या दिवसातच जाणवते. आपल्या नशिराबादच्या बाजूला उन्हाळयातच अशा प्रकारचा त्रास जाणवतो. | | येणार नाही, खर्च होणार नाही व त्रास होणार नाही. जेणेकरुन कमी खर्चात जास्त उत्पादन काढता येईल व त्रासही कोणाला होणार नाही. गेट अजून करावेत जेणेकरुन एकाच ठिकाणी लोड येणार नाही. जास्तीत जास्त रोजगार निर्मीतीसाठी प्रयत्न करण्यात येतील. |

श्री. करनसिंग अमरसिंग राजपूत, उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ यांनी सर्व सहभागी नागरिकांना आवाहन केले की अजून कुणास आपले मत मांडावयाचे असल्यास ते मांडू शकतात. त्यानंतर कुणीही आपले म्हणणे मांडावयास पुढे आले नाही.

अध्यक्ष, जाहीर लोकसुनावणी यांनी नमूद केले की, नागरिकांनी मांडलेल्या सर्व मुद्द्याची नोंद घेण्यात येईल व सदर सुनावणीचे संक्षिप्त इतिवृत्ता सोबत सुनावणीचे रिकार्डिंग आवश्यक त्या दस्त ऐवजासह पुढील कार्यवाहीसाठी शासनाकडे सादर करण्यात येईल व सर्वांचे आभार मानून जाहीर लोकसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(करणसिंग अमरसिंग राजपूत)
समन्वयक
तथा
उप-प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
जळगांव

(लिंबाजी सु भड)
सदस्य
तथा
प्रादेशिक अधिकारी
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
नाशिक

(आयुष प्रसाद) भा.प्र.से.
अध्यक्ष
तथा
जिल्हादंडाधिकारी, जळगांव

Sub.Regional Officer Jalgaon M.P.C.Board

जिल्हाधिकारी जळगाव